महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथामजला) सर्व्हे नं. ८३२ ए, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४
दूरध्वनी क्र. : 020 -29709617 वेबसाईट :-mscepune.in ई-मेल :-www.mscegcctbc@gmail.com

जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा/पु.परी/ऑक्टो-२०२६/4160
दिनांक :- 21 /०९/२०२६.

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व शासकीय संगणक लघुलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-COMPUTER SHORTHAND) जुलै - २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी अनुत्तीर्ण झालेले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव परीक्षेस प्रविष्ठ होता आलेले नाही, अशा विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा ऑक्टोंबर २०२६ मध्ये घेण्यात येणार आहे.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या संगणक टायपिंग संस्थेमार्फत आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

सदर पुनर्परीक्षांसाठी संगणक संस्थेमार्फत अधिकचे शुल्क आकराणी करण्यात येत असलेबाबतच्या तक्रारी ई-मेलद्वारे या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद पुनर्परीक्षांसाठी जे उमेदवार प्रविष्ठ होणार आहेत, अश्या उमेदवारांकडून **परीक्षा सामग्री शुल्क न घेता केवळ मासिक शुल्क प्रति विषय (जितके महिने प्रशिक्षण घेणार,केवळ तेवढयाच महिन्यांकरिता संगणक टंकलेखन रु.८००/- प्रतिमाह व संगणक लघुलेखनासाठी रु.६००/-प्रतिमाह) व परीक्षा शुल्क (रु.११००/- परीक्षा परिषद) घेण्यात यावे.** तसेच ज्या उमेदवारांकडून परीक्षा साम्रगी शुल्क घेण्यात आलेले आहे, अशा उमेदवारांना परीक्षा साम्रगी शुल्काची रक्कम परत करण्यात यावी.तसेच यापुढे संगणक टंकलेखन व लघुलेखन पुनर्परीक्षांसाठी कोणत्याही प्रकारचे सामग्री शुल्क नव्याने घेता येणार नाही,याबाबत संस्थांचालकांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त नमूद परीक्षा शुल्क आकारणीबाबत कोणतीही तक्रार या कार्यालयास पुनश्च: प्राप्त होणार नाही, याबाबत सर्व शासनमान्य संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.

21/9/26

(नंदकुमार बेडसे- भा.प्र.से)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -०४.